# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

१६ एप्रिल, २०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

## सोशल मिडियावर पैशांची आमिष दाखवुन अफवा/ आर्थिक फसवणुक करणाऱ्यांविरूध्द गुन्हा दाखल

कोरोना विषाणुचा वाढता प्रादुर्भावच्या पार्श्वभुमिवर सर्व सामान्य जनतेला केंद्र शासनाकडुन प्रत्येकी १५ हजार रूपये देण्यात येत असल्याचे खोटी बतावणी करून सदरची रक्कम प्राप्त करण्यासाठी ऑनलाईन लिंकवर संपुर्ण वैयक्तीक माहिति, बॅक डिटेल्स भरण्यास लावुन त्यांची फसवणुक करण्याचा प्रयत्न करणारे अनोळखी इसमाविरूध्द पोलीस स्टेशन रामनगर येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सायबर पोलीस स्टेशन अधिकारी कर्मचारी सद्याच्या कोरोनाच्या विषाणुच्या पार्श्वभुमिवर सोशल मिडिया पेट्रोलींग करीत असतांना असे आढळुन आले की, सोशल मिडिया/व्हॉट्सअॅपच्या माध्यमाने ‘‘सभी भारतीयों को इन कठीण परिस्थितीओं मे प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत १५ हजार रूपयाची मदत कर रहे है.’’ अशी खोटी बतावणी करून एक खोटया वेबसाईटची लिंक शेअर केल्याचे दिसुन आले. त्यावरून सदर लिंकची सायबर पोलीस स्टेशन येथे पाहणी व पडताळणी केली असता असे निष्पन्न झाले की, सदरची लिंक लोंकाची फसवणुक करण्याकरीता बनावट/खोटी तयार करण्यात आलेली आहे. सदर लिंक तयार करणाऱ्या गुन्हेगारांचा शोध घेवुन त्यांना लवकरात लवकर अटक केले जाईल.

## आवाहन

**‘‘पोलीस अधीक्षक चंद्रपुर डॉ. महेश्वर रेड्डी यांनी सर्व जनतेला आवाहन केलेले आहे की, अशा सोशल मिडियावरील पैशाचे आमिश दाखविणाऱ्या लिंकवर क्लिक करून त्यावर आपली स्वत:ची वैयक्तीक माहिती व बॅकेची माहिती भरून खोटया आमिषास बळी पळु नये.’’ त्याचप्रमाणे सद्यास्थितीत काही अनोळखी लोक भारतीय सेनेमध्ये असल्याचे सांगुण त्यांचे ओळखपत्र, आधारकार्ड इत्यादी नागरीकांचे व्हॉट्सअॅपवर पाठवुन त्यांना चारचाकी/दुचाकी वाहन विकणे असल्याचे सांगुण नागरीकांच्या Phone pay/Paytm/Bhim/Google pay व इत्यादी अॅपद्वारे पैशाची मागणी करून आर्थिक फसवणुक करीत आहे. अशा कोणत्याही आमिषास बळी न पडता नागरीकांनी सावधगीरी बाळगावी.**

———————————————————————————————